# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल :dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : शै/सि/अ/1116
दिनांक : 12 मे, २०१५

१) मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये

२) मा. संचालक
सर्व मान्यताप्राप्त संस्था
(पुणे, अहमदनगर, नाशिक)

विषय : शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्याच्या मुदतीसंदर्भात.

महोदय,

शिक्षकांच्या निवड समितीचे अहवाल (स्थानिक निवड समिती / विद्यापीठ निवड समिती) शिक्षक निवड समितीची बैठक झाल्यानंतर ७२ तासांचे आत विद्यापीठास सादर करावे लागतात. त्यानंतर शिक्षकांना निवड समितीच्या अहवालातील शिफारशींनुसार संस्था नेमणूक पत्रे देते व नेमणूक पत्र दिल्यानंतर सदर शिक्षक त्यांच्या विहित पदावर रूजू होतात. संबंधित शिक्षक संबंधित महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थेत रूजू झाल्यावर त्यांच्या मान्यतेचा प्रस्ताव हा त्यांच्या रूजू दिनांकापासून एक महिन्याच्या आत विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सादर होणाऱ्या शिक्षक मान्यता प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्षकांच्या मान्यतेची पत्रे ही संस्थाचालकांना / प्राचार्यांना पाठविली जातात. सदर मान्यता पत्रात काही त्रुटी असल्यास त्या त्रुटींची लिखित स्वरूपात माहिती विद्यापीठाचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत शैक्षणिक विभागातील संबंधित कर्मचाऱ्यास लेखी स्वरूपात निदर्शनास आणून द्यावी. मान्यता पत्रे प्राप्त झाल्याच्या एक महिन्यानंतर याबाबत कोणत्याही तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही.

कळावे,

आपला,

12/5/15

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)